# महानगरपालिका अमरावती,

## महिला व बाल विकास विभाग

---

जा.क्र. अमनपा/मबावि/ 18 /2026-27 दिनांक - 29 / 04 / 2026

**कोटेशन नोटीस**

महिला व बाल विकास विभाग, महानगरपालिका, अमरावती यांचे कडून खालील काम करण्याकरीता कोटेशन मागविण्यात येत आहे. त्याकरीता संबंधीत कार्य करणाऱ्यांनी दरपत्रक मोहोर बंद लिफाफयामध्ये ( कोटेशन ) दि. 7 / 05/2026 रोजी सकाळी 10. 30 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे. मुदतीत प्राप्त कोटेशन त्याच दिवशी उघडण्यात येईल.तसेच कुठलेही कारण न देता एक किंवा सर्व कोटेशन नाकारणे , स्वीकारणे यांचे अधिकार खाली सही करणार अधिकारी यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहे.

| क्र | कामाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1 | अमरावती महानगरपालिका द्वारा संचालीत स्पर्धा परीक्षा ग्रंथालय/अभ्यासीका करीता आवश्यकतेनुसार पुस्तकांचा पुरवठा करण्याकरीता दरकरार करणे. | पुस्तकाच्या मुळ किमती पेक्षा किती टक्के कमी दराने पुरवठा करणार यानुसार दर सादर करावे. |

अवश्यक कागदपत्र :-

1. पॅनकार्ड
2. शॉप ॲक्ट लायसन्स
3. संबंधीत कामाचा शासकीय कामाचा अनुभव ( पुरावा जोडावा )
4. दरपत्रक ( Quatation )

अटी व शर्ती :-

1. वरील कामाकरीता या संबंधीत संस्था / एजन्सी यांनीच दरपत्रक सादर करावे.
2. शासकीय विभागांमध्ये पुस्तके पुरवठा केलेला असावा.
3. मुळ किमतीपेक्षा किती टक्के कमी दराने पुरवठा करणार यानुसार सादर करावे .व सदर दर सर्व खर्च व करांसह द्यावे. ज्यात लागु असलेले सर्व शासकीय करांचा समावेश असावा.
4. सादर केलेले मंजुर झालेले दर 1 वर्ष पर्यंत लागु राहिल. व मनपा आदेशीत करेल त्या यादीनुसारच व संख्येत व मुदतीत काम करणे दरपत्रकधारकास बंधनकारक राहित.
5. दरपत्रक मंजुर झाल्यास नियमानुसार मुद्रांकवर करारनामा व सुरक्षा रक्कम सादर करावी लागेल.
6. कोणत्याही कारणास्तव देयक अदा होण्यास विलंब झाल्यास मनपा व्याज देणार नाही.
7. अटी असलेले दरपत्रक अपात्र असतील.
8. अधिक माहितीकरीता महिला व बालविकास विभाग , मनपा अमरावती येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

महिला व बाल विकास अधिकारी
महानगरपालिका अमरावती

उपायुक्त - 2
महानगरपालिका,अमरावती

प्रतिलीपी- सिस्टीम मैनेजर मनपा, अमरावती यांना मनपा पोर्टलवर नोटीन प्रसिद्ध करण्याकरीता

Scanned with OKEN Scanner